सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परिपत्रक

सर्व शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/सेवकांना आणि विद्यार्थ्यांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, गुरुवार दि. २६ नोव्हेंबर, २०२६ **(कार्तिक कृ. २, शके १९४८)** रोजी विद्यापीठात भारतीय संविधान दिवसानिमित्त **संत ज्ञानेश्वर** सभागृहामध्ये मा. भरत उत्तमराव आदमापूरे, उदगीर, जि. लातूर यांचे **'भारतीय संविधान व आपण नागरिक'** या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. परंतु काही अपरिहार्य कारणास्तव सदरचे व्याख्यान संपन्न होऊ शकले नाही.

त्यामुळे सोमवार दि. ३० नोव्हेंबर, २०२६ **(कार्तिक कृ. ७, शके १९४८)** रोजी विद्यापीठाच्या संत ज्ञानेश्वर सभागृहात सायं. ४.०० वा. **मा. कुलगुरू, प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली** सदरच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी कृपया सर्वांनी आवर्जून उपस्थित रहावे व व्याख्यानाचा लाभ घ्यावा, ही विनंती.

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.
जा.क्र. जसं/११/४४१
दि. २७ नोव्हेंबर, २०२६
कार्तिक कृ. ३/४, शके १९४८

सहायक कुलसचिव
जनसंपर्क विभाग

प्रत माहितीसाठी आणि उपरोक्त कार्यक्रमास उपस्थित राहण्याच्या विनंतीसह रवाना:

१. मा. प्र–कुलगुरू :– यांना विनंती की, कृपया आपण कार्यक्रमास उपस्थित रहावे.
२. मा. कुलसचिव :– यांना विनंती की, कृपया आपण कार्यक्रमास उपस्थित रहावे.
३. मा. अधिष्ठाते व मा. सर्व संविधानिक अधिकारी :– यांना विनंती की, कृपया आपण कार्यक्रमास उपस्थित रहावे.
४. मा. व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, मा. विद्यापरिषदेचे सदस्य आणि मा. अधिसभा सदस्य यांना विनंती की, कृपया आपण कार्यक्रमास उपस्थित रहावे.
५. मा. विभागप्रमुख/मा.शाखाप्रमुख :– सदर परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणावे, ही विनंती.
६. मा. संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र :– ग्रंथालयामधील सर्व विद्यार्थी/विद्यार्थिनी यांना कार्यक्रमास उपस्थित राहण्यासंबंधी सूचना द्याव्यात.
७. मा. वसतिगृह प्रमुख :– वसतिगृहातील सर्व विद्यार्थी/विद्यार्थिनी यांना कार्यक्रमास उपस्थित राहण्यासंबंधी सूचना द्याव्यात.
८. मा. संचालक,विद्यार्थी विकास मंडळ आपल्या योजनेतील विद्यार्थ्यांना कार्यक्रमास उपस्थित राहण्यासंबंधी सूचना द्याव्यात.
९. मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना आपल्या योजनेतील विद्यार्थ्यांना कार्यक्रमास उपस्थित राहण्यासंबंधी सूचना द्याव्यात.
१०. मा. अध्यक्ष/सचिव सर्व शिक्षक/शिक्षकेतर सेवक संघटना.